ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १५ जुलै, १९६४ | अंक १४

## विविध माहिती

**कोळशाच्या मागणीचा अंदाज**—चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत देशांतील पोलादाचे कारखाने, वीज-निर्मिति-केंद्रें, इत्यादींसाठीं १३·६ कोटी टन कोळसा लागेल असा अंदाज आहे. इतका कोळसा पुरवावयाचा तर चालू कार्यक्रमाअखेरीस होऊ शकणाऱ्या उत्पादनापेक्षा ६ कोटी टन अधिक कोळसा वर काढण्यांत आला पाहिजे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ७·६ कोटी टन कोळसा काढण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

**मधुमेहाचें निदान**—कॅनडामधील मधुमेहविषयक संघटनेनें असें जाहीर केलें आहे कीं, मधुमेहाच्या रोगाचें त्वरित निदान करतां येण्यासारखी रक्ताची तपासणी आतां शक्य झाली आहे. त्यामुळें ह्या रोगासंबंधीं विस्तृत तपासणी करणें शक्य झालें आहे. रक्तांतील मधुमेहाच्या विकाराचे रोगी अंदाजापेक्षा जास्त असतात असा अभिप्राय ब्रिटनमधील एका संस्थेनें व्यक्त केला आहे.

**आंब्याची पूड करण्याचा कारखाना**—जळगांव येथील जिल्हा सहकारी संघटनेनें आंब्याची पूड करण्याच्या कामांत यश मिळविलें आहे. ह्याच कारखान्यांत केळ्यांचीहि पूड बनविण्यांत येते. केळीं व आंबा ह्यांच्याप्रमाणेंच पपयांचीहि पूड बनविण्यांत येते. डेन्मार्कमधील एका कंपनीमार्फत कारखान्याला लागणारी यंत्रसामग्री पुरविण्यांत आली आहे. ह्या फळांची पूड परदेशीं धाडल्यामुळें परदेशीय चलनाची प्राप्ति होण्याची शक्यता आहे. कारखान्यांत सहकारी संघटनेनें १२ लाखांचें भांडवल गुंतविलेलें आहे. महाराष्ट्र सरकारनेंहि २ लाख रु. भांडवल दिलेलें आहे.

**अमेरिकन संघटनेची मदत**—‘केअर’ ह्या अमेरिकन संघटनेतर्फे शाळकरी मुलांना खाद्यपदार्थ पुरविण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. त्यामुळें ७० लाख मुलांना खाण्याच्या वस्तू पुरविण्यांत येतील. कार्यक्रम अमलांत आणण्यासाठी ह्या वर्षीं २० कोटी पौंड अन्नपदार्थ भारतांत आयात करण्यांत येतील. त्याशिवाय शेतीसाठी उपयुक्त अशीं हातानें वापरण्याचीं हत्यारें, बियाणें, कोंबड्या पाळण्याचें साहित्य, इत्यादी वस्तूहि संघटना देणार आहे.

**सरकारी इमारतींना रंगरंगोटी**—भारतावर चीनचें आक्रमण होण्यापूर्वीं मध्यवर्ती सरकारच्या इमारतींना दरसाल रंगरंगोटी करण्यांत येत असे. परंतु आणीबाणीची परिस्थिति उद्भवल्यामुळें ही पद्धत बंद करण्यांत आली होती. आतां ही बंदी रद्द करण्यांत आली आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे ज्या इमारतींची देखभाल करण्यांत येत होती, अशा इमारतींच्या व्यवस्थेवरील खर्चांत बंदीमुळें १९६३–६४ सालांत ६९ लाख रुपयांची बचत झाली होती.

**विमानांवरील निशाण्यांसाठी शाई**—कानपूर येथील संरक्षण संशोधन केंद्रानें विमानावरील निशाण्यांसाठी वापरण्यांत येणारी शाई शोधून काढली आहे. ही खास प्रकारची शाई सध्यां आयात करावी लागते. शाई तयार करण्यासाठीं लागणारा कच्चा माल देशांतूनच पैदा करण्यांत आला आहे. शाईची चांचणी करण्यांत येत आहे.

**१७० इमारती धोक्याच्या**—मुंबईमधील १७० इमारती राहण्याच्या लायकीच्या उरल्या नसल्यामुळें त्या पाडून टाकण्याचे हुकूम कॉर्पोरेशननें नुकतेच काढले आहेत. ह्या इमारतींत माणसांनीं राहणें धोक्याचें असल्याचा इषारा तेथें राहणाऱ्या भाडेकरूंना देण्यांत आला आहे. कांहीं जुन्या इमारतींची तात्पुरती दुरुस्ती करून त्या पावसाळ्यापुरत्या वापरण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

**राजस्थानमधील कालवा**—राजस्थानला पंजाबमधील बियास आणि सतलज नदीच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या कालव्यांत प्रथमच पाणी सोडण्यांत आलें. ह्या कालव्यामुळें राजस्थानमधील रेताड प्रदेशाला पाण्याच्या पुरवठ्याची निश्चिती झाली आहे. पंजाबमधील एंजिनिअर्सनीं आपल्या भागांतील कालवा वेळेवर पुरा केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देण्यांत आले.

**डासांची उत्पत्ति थांबविण्याचा प्रयत्न**—इजिप्तमध्यें हिवतापाच्या रोगाचे प्रसार करणारे डास अनेक ठिकाणीं आढळून येतात. हिवतापाच्या डासांचें प्रजोत्पादन थांबविण्याची एक योजना युनायटेड अरब रिपब्लिकच्या सरकारनें आखली आहे. सरकारच्या अणुशक्ति मंडळानें डासांतील नरांचें निर्बीजीकरण करण्याची पद्धत शोधून काढली आहे. ह्या पद्धतींत अणु किरणांचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**कलकत्त्यामधील खोटीं शिधापत्रकें**—कलकत्ता शहरांत अन्नधान्याचें वांटप करण्यासाठी सुमारें ४२ लाख शिधापत्रकें देण्यांत आलीं आहेत. त्यांपैकीं ९ लाख शिधापत्रकें तरी खोटीं असावींत असा अंदाज आहे. अलीकडेच पोलिसांनीं शिधापत्रकांची घरोघरीं जाऊन तपासणी केली असतां ९ लाख कार्डवाल्यांनीं तांदूळ अगर साखर घेतल्याचें आढळून आलें नाहीं.

**हिंदी कवींचा गौरव**—नाटककार शेक्सपिअर ह्याला आदरांजली वहाण्यासाठी ब्रिटिश कलामंडळानें इंग्रजी जाणणाऱ्या १५ कवींना शेक्सपिअरविषयक कविता लिहावयास पाचारण केलें. ह्या पंधरा कवींमध्यें एक हिंदी कवि असून त्याचें वय २६ वर्षाचें आहे. कवींच्या कविता नाटककाराच्या जन्मगांवीं झालेल्या समारंभांत म्हणून दाखविण्यांत आल्या.

## रशियाकडून पेट्रोलजन्य पदार्थांची आयात

येत्या तीन वर्षांच्या काळांत रशिआकडून भारत १५ लाख टन पेट्रोलजन्य पदार्थांची आयात करणार आहे. ह्या पदार्थांत मुख्यत: केरोसीन, डिझेल आणि उद्योगधंद्यांत जळणासाठी वापरण्यांत येणारें तेल ह्यांचा समावेश आहे. भारत आणि रशिया ह्यांच्यांत तेलविषयक झालेला हा ४था करार आहे. भारताची इंडिअन ऑईल कंपनी व रशिअन सरकारची संघटना ह्यांच्या प्रतिनिधींनीं मुंबई येथें ह्या करारावर सह्या केल्या. करारामुळें उभयतां देशांचें हित होणार आहे. भारताच्या दृष्टीनें आयातीची किंमत रुपयाच्या चलनांत द्यावयाची आहे, ही बाब महत्त्वाची आहे. कारण त्यामुळें टंचाई असलेल्या परदेशीय चलनाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. खनिज आणि तज्जन्य पदार्थ ह्यांच्या बाबतींत असलेलें परावलंबन कमी करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस, म्हणजे १९६६ च्या शेवटीं, भारतामधील तेलाची मागणी १.६ कोटी टनाच्या आसपास जाईल. त्यापैकी ५० टक्के गरज भारतामधील सार्वजनिक मालकीचे तेलशुद्धीचे कारखाने भागवूं शकतील असा अंदाज आहे. बरौनी येथील तेल-शुद्धीचा कारखाना ह्या वर्षी पूर्ण उत्पादन करूं लागेल. पुढील वर्षी गुजरातमधील कोयाली येथील कारखाना चालू होईल आणि १९६६ मध्यें कोचीन येथील कारखाना चालू होईल. इंडिअन ऑईल कंपनीची स्थापना १९६० मध्यें झाली असून भारतामधील कारखान्यांतून तयार होणारें तेल तीच बाजारात पाठवीत असते. तथापि, देशांतील तेलाची वाढती गरज भागविण्यासाठी परदेशा-कडून त्याची आयात करणें अजून कांहीं वर्षे बरी आवश्यक भासणार आहे. १९६० सालीं भारतानें रशिआकडून प्रथमच तेल आयात केलें.

## बोकॅरो येथील पोलादाचा कारखाना

बोकॅरो येथें उभारण्यांत यावयाच्या सार्वजनिक मालकीच्या पोलादाच्या कारखान्याचे काम ठरलेल्या वेळापत्रकांत पूर्ण करण्यांत यावें अशी इच्छा भारत सरकारनें रशिआकडे व्यक्त केली आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीसंबंधीं दस्तूर आणि कंपनीनें केलेल्या अहवालाचा अभ्यास अद्याप पुरा झालेला नाही. त्यामुळें रशिअन तंत्रज्ञांचें आगमन लांबलें आहे. तथापि, हा कारखाना १९६८ अखेर उत्पादन करूं लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. कारखान्याची प्रारंभीची उत्पादनक्षमता १५ लाख टनांची असेल. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कार-खान्याच्या कामाला अग्रहक्क देण्यांत येणार असून, त्याच्या उत्पादनांतील कांहीं हिस्सा परदेशीं निर्यात करण्यासाठी राखून ठेवण्यांत येणार आहे. कारखान्याचे जनरल मॅनेजर लवकरच रशिआला जाणार आहेत.

## दिल्ली ते लंडन नवा विमानमार्ग

एअर इंडिआ आणि रशिआची नागरी वैमानिक संघटना ह्यांनीं एक करार करून दिल्ली ते लंडन ह्या मार्गावर मॉस्कोच्या वाटेनें नवीन वाहतूक सुरू करण्यासाठी एअर इंडिआला परवानगी दिली आहे. हा प्रवास आठवड्यांतून दोनदा करण्यांत येणार आहे. हा नवीन मार्ग एअर इंडिआच्या पश्चिमेकडून लंडनला जाणाऱ्या मार्गापेक्षा बराच जवळचा होईल. पश्चिमेकडून लंडनला जाणाऱ्या मार्गानें गेल्यास दिल्लीहून लंडनला जाण्यास १६ तास प्रवास करावा लागतो. नव्या मार्गानें हा प्रवास १२ तासांत करतां येईल. नव्या मार्गानें येत्या ऑक्टोबरपासून विमानें सोडण्यांत येतील. त्यासाठी बोइंग विमानें वापरण्यांत येतील. प्रवासाचें भाडें मात्र दोन्ही मार्गावर एकच राहणार आहे.

## इंग्रजी–तामाळ शब्दकोषाचे प्रकाशन

मद्रास सरकारच्या तामीळ ग्रंथ प्रकाशन संस्थेनें इंग्रजी-तामीळ शब्दकोष तयार करण्याची योजना आंखली आहे. हा शब्दकोष मूळ एका सेवानिवृत्त एंजिनिअरने तयार करण्यास घेतला होता. परंतु शब्दकोषाचें काम पूर्ण होण्यापूर्वीं तो मृत्यु पावला. नंतर त्याच्या मुलानें शब्दकोषाची मूळ प्रत मद्रास सरकारला दिली. शब्दकोषाचे एकूण चार किंवा पांच खंड होतील. प्रत्येक खंडाचीं सुमारें ५०० पृष्ठें भरतील असा अंदाज आहे.

## नाणेंनिधीच्या कर्जाची फेड

आंतरराष्ट्रीय नाणेंनिधीकडून भारतानें घेतलेल्या कर्जापोटीं आणखी एक हप्ता परतफेडीसाठी देण्यांत आला आहे. ह्या हप्त्याची रक्कम ३.५ कोटी डॉलर्स अथवा सुमारें १२ कोटी रुपये आहे. आतां भारतानें निधीचे २० कोटी डॉलर्स अथवा ९५ कोटी रुपये फेडावयाचे आहेत. मूळ कर्ज भारतानें १ ऑगस्ट १९६१ रोजीं घेतलें होतें व तें २५ कोटी डॉलर्सचें होतें. ह्या वर्षाच्या प्रारंभीं २.५ कोटी डॉलर्सचा पहिला परतफेडीचा हप्ता पाठविण्यांत आला होता.

## हिंदी रेस्टॉरॉची प्रशंसा

न्यूयॉर्क येथें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनात भारतीय पद्धतीचें रेस्टॉरॉ उघडण्यांत आले आहे. न्यूयॉर्क टाइम्स ह्या अमेरिकन दैनिकानें त्याच्या आकर्षकतेची आणि तेथें मिळणाऱ्या अन्नपदार्थांची प्रशंसा केली आहे. तेथील लावण्यसंपन्न हिंदी व्यवस्थापिकांनीं व त्यांच्या सुंदर साड्यांनींहि ह्या वृत्त-पत्राचें लक्ष वेधून घेतलेलें आहे.


तुमचा "पगाराचा दिवस" हा
तुमचा "बचत दिन" हि आहे !

एकदा तुम्ही खर्चायला प्रारंभ केला, कीं तुमचे पैसे इतक्या लवकर संपतील की तुम्ही बचतीचा विचार पुढच्या महिन्यावर ढकलाल (असें होत होत तो पुढील महिना कधींच यावयाचा नाहीं !)

तेव्हां, तुमच्या पगाराच्या दिवशींच आमच्या कोणत्याहि शाखेंत तडक या, आणि आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग बाजूला काढून बचत करा.

दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना : १९३० : शेड्यूल्ड बँक

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

म्हैसूर आणि महाराष्ट्रभर ३१ शाखा

ठेवींची रक्कम : रु. २ कोटी, ४७ लक्षांवर

४

# अर्थ

बुधवार, १५ जुलै, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


### समाजहिताच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी

मद्रास येथें समाजहिताच्या कामाविषयीं दोन आठवड्यांचा एक विभागीय परिसंवाद भरविण्यांत आला होता. परिसंवादाचें उद्घाटन नियोजन समितीचे सभासद डॉ. राव ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, सामाजिक स्वरूपाचे प्रश्न सोडविण्यासाठी माणुसकीच्या दृष्टिकोणाची आवश्यकता असते. म्हणून स्वेच्छेनें काम करणाऱ्या संघटनांना ह्या क्षेत्रांत पुष्कळच काम करतां येण्यासारखें आहे. समाजहिताच्या योजना अमलांत आणण्याचें काम सध्या राज्यसरकारांवर सोपविलेलें आहे. परंतु असें करणें युक्त नाहीं. सरकारची यंत्रणा ही अनेक नियमांनीं आणि बंधनांनीं जखडलेली असते. ह्यामुळें समाजहिताचीं कामें करतांना तिची कार्यक्षमता पुरी पडत नाहीं. काम करतांना प्रत्यक्ष हस्तक्षेप करणें त्यांना जमत नाहीं. हिंदी समाजांत समाजहिताचीं कामें करणाऱ्या संस्थांचा समाजावर अद्याप तरी बेताचाच प्रभाव पडतो. ह्या बाबतींत हिंदी समाज अगदीं प्राथमिक अवस्थेंत आहे. सामाजिक हिताचीं कामें करणाऱ्या संघटनांनीं पैशासाठी फक्त सरकारवर अवलंबून असणें बरें नव्हे. ज्या कामासाठी सरकार पैसा उपलब्ध करूं शकत नाहीं. त्या कामासाठी स्वतःच पैसा उभारणें ह्यांतच त्यांची खरी कसोटी आहे. समाजहिताचीं कामें करतांना भलत्याच महत्त्वाकांक्षी योजना आखण्यापेक्षा स्थानिक गरजांकडे लक्ष पुरविणें अधिक जरुरीचें आहे. एखाद्या राज्यभर अगर विभागावर कामाचा पसारा वाढविण्याचा मोह समाजहित संघटनांनीं पाळला पाहिजे. कांहीं राज्यसरकारांनीं अशा कामासाठी अंदाजपत्रकांत तरतूद केलेल्या रकमाहि खर्च झालेल्या नाहींत असें आढळून आलें आहे. कारण, पैशाचा उपयोग शहाणपणानें व कार्यक्षमतेनें करण्याची यंत्रणाच अस्तित्वांत नाहीं.

### बिहारमधील रेशमाच्या धंद्याचा विकास

बिहारमधील रेशमाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचा एक कार्यक्रम मध्यवर्ती सरकारनें तयार केला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस रेशमाच्या कापडाची निर्यात वाढविण्याचा निर्णय घेण्यांत आल्यामुळें रेशमाच्या उत्पादनांत वाढ करणें अगत्याचें झालें आहे. बिहारमधून दरसाल ४० लाख रुपयांचें रेशमी कापड अमेरिकेला निर्यात करण्यांत येतें. भागलपूर येथील रेशमी कापडाला तर अमेरिकेंत नेहमींच चांगली मागणी असते. बिहारमध्यें सालिना ४५ लाख वार रेशमाचें कापड निर्माण करण्यांत येतें. त्यांत कांहीं कापड शुद्ध रेशमाचें आणि कांहीं मिश्र असतें. ह्या सर्व कापडाची किंमत २५ कोटींच्या आसपास होते. रेशमाच्या कोषांची पैदास आणि हातमागावरील रेशमी कापडाची निर्मिति ह्यांत बिहारमधील १ लाख स्त्री-पुरुष कामगरांना रोजगार मिळत आहे. हातमागांची संख्या २,८०० इतकी आहे. रेशमाचे किडे पाळून त्याच्या कोषांचें उत्पादन करण्याच्या कामांत ५० हजार लोक गुंतलेले आहेत. रेशमाच्या किड्यांचें खाद्य म्हणजे तुतीच्या व एरंडाच्या झाडांचीं पानें. हीं पानें पुरविण्यासाठी बिहारमध्यें ३० हजार एकर जमिनींत ह्या झाडांची लागवड करण्यांत आलेली आहे. मध्यवर्ती सरकारनें आंखलेल्या कार्यक्रमाप्रमाणें स्थानिक शेतकऱ्यांना ह्या झाडांची लागवड करण्यास उत्तेजन देण्यांत येणार आहे. बिहारमध्यें रेशमाच्या धंद्याचें शिक्षण देणारीं केंद्रें असून त्यांत दरसाल ६०० लोकांना शिक्षण देण्यांत येतें. रेशमाच्या किड्यांची जोपासना करण्यापासून ते रेशमी कापड विणण्याच्या सर्व अवस्थांत लागणारें शिक्षण ह्या केंद्रांतून देण्यांत येत असतें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सुमारें ३० हजार लोकांना शिक्षण देण्यांत आलें.

### सिगारेट्च्या कंपन्या स्वस्थ बसणार नाहींत.

अमेरिकेच्या सरकारनें सिगारेटच्या व्यसनामुळें आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमलें होतें. ह्या कमिशननें आपल्या अहवालांत, धूम्रपानानें आरोग्याला अपाय होतो असें मत निःसंदिग्धपणें व्यक्त केलें. अहवालाला अनुसरून कमिशननें तंबाखू वापरणाऱ्या कंपन्या अयोग्य व्यापार करीत असल्याची तक्रार सरकारकडे केली आणि त्यावर इलाज करण्याची मागणी केली. त्याप्रमाणें अमेरिकन सरकारनें पुढील जानेवारीपासून सिगारेटच्या कंपन्यांनीं आपल्या पाकिटावर आंतील माल आरोग्यास घातक असल्याचा स्पष्ट इशारा ठळकपणें द्यावा अशी सक्ति केलेली आहे. असा हुकूम काढणें अमेरिकेच्या फेडरल ट्रेड कमिशनच्या पूर्णपणें अखत्यारांत आहे. १९६५ च्या जुलै महिन्यापासून सिगारेटच्या सर्व जाहिरातींतूनहि असा इशारा देण्यांत यावा असें सांगण्यांत आलें आहे. सरकारनें चालविलेल्या ह्या मोहिमेला प्रत्युत्तर देण्याची तयारी अमेरिकेंतील सिगारेटसूच्या कंपन्या मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. तंबाखू पिकविणारे शेतकरी, त्याचा गुदामांत साठा करणारे व्यापारी आणि सिगारेटसूच्या कंपन्या ह्यांच्यातर्फे सरकारी हुकुमांची फेरतपासणी करण्याचा अर्ज अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाकडे करण्यांत येणार आहे. पुढील वर्षाच्या जानेवारी व जुलैनंतर हे हुकूम फार काल अमलांत राहण्याचा संभव बेताचाच आहे. तंबाखू व त्याचे पदार्थ तयार करणाऱ्या हितसंबंधीयांनीं कोर्टाकडे केलेले अर्ज सुनावणीस निघून प्रकरणाचा निकाल लागण्यास निदान चार वर्षांचा तरी अवधि लागेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

### सिंडिकेट बँकेचे मॅ. डायरेक्टर परदेशीं रवाना

सिंडिकेट बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. टी. ए. पै हे सोमवार, दि. ६ रोजीं जपान आणि अमेरिका ह्या देशांकडे जाण्यास निघाले. तेथील बँकिंगचा ते अभ्यास करणार आहेत. बँकेच्या मुंबई शाखेनें त्यांना निरोप देण्यासाठी एक समारंभ घडवून आणला.

### ख्रिस्ती वाङ्मयाच्या प्रसारासाठी ' लार्ड नफील्ड ' पाहिजे

ख्रिस्ती वाङ्मयाचा प्रसार करण्यासाठी यॉर्कचे आर्चबिशप, डॉ. कॉगन ह्यांनीं १५० लक्ष रुपयांचा एक फंड उभारण्याचें ठरविलें आहे. ख्रिस्ती वाङ्मय लिहिण्यासाठी, त्याचें चित्रण करण्यासाठी, त्याच्या प्रचारासाठी स्त्री-पुरुषांची फौजच आवश्यक आहे, असें त्यांनीं ब्रिटिश अँड फॉरिन बायबल सोसायटीच्या वार्षिक सभेंतील आपल्या भाषणांत सांगितलें. " जगभर साक्षरता वाढत असून वाचनाची भूक वणव्यासारखी पसरत आहे; त्याचा वेग आतां थांबवितां येणारच नाहीं. लार्ड नफील्डनें इस्पितळें आणि वैद्यकीय संशोधन ह्यासाठी जशा प्रचंड देणग्या दिल्या, तशा ख्रिस्ती वाङ्मयाच्या प्रचाराला देणारा दानशूर आवश्यक आहे " असेंहि त्यांनीं आवाहन केलें.

### यूनिट ट्रस्टचा खुलासा

कुणालाहि कितीहि युनिट्सची सर्टिफिकेटस् खरेदी करता येतात; १० किंवा १० च्या गुणाकाराइतकी म्हणजे १०, २०, ३०, ४०, ५०,इत्यादि युनिट्स एका वेळीं घ्यावी लागतात एवढीच अट आहे. प्रत्येक १० युनिट्सचें सर्टिफिकेट असण्याची आवश्यकता नाहीं. उदाहरणार्थ, १०० युनिट्स खरेदणारा तितक्या युनिट्सचें एक किंवा प्रत्येकीं ५० युनिट्सची दोन अशी सर्टिफिकेटेंहि मागूं शकतो; त्याला प्रत्येकीं १० युनिट्सची १० सर्टिफिकिटेंहि मागतां येतील. कांहीं युनिट्स पुढें विकली गेली तर उरलेल्या युनिट्सचें नवें सर्टिफिकेट कांहींहि चार्ज न पडता मिळण्याची व्यवस्था आहे.

### इंडियन एअर लाइन्सचीं जनता विमानें

इंडियन एअर लाइन्स कॉर्पोरेशन जनता विमान वहातूक २ ऑक्टोबर रोजीं सुरू करणार आहे. विमानाचा प्रवास स्वस्त आणि लोकप्रिय करणें हा त्याचा उद्देश आहे जनता विमानांत एअर होस्टेस असणार नाहीं, खाद्यपेयें मिळणार नाहींत, उतारूंची विमानतळापर्यंतची ये-जा एअर लाइन्सतर्फे होणार नाहीं. आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या भाड्यापेक्षा जनता विमानाचें भाडें थोडेसेंच अधिक असेल. प्रथम पंजाबांतील प्रमुख शहरांनाच ह्याचा फायदा मिळेल.

### ऑलिंपिक मशाल वहाण्यासाठी १,००,६९६ तरुण

टोकियो येथील ऑलिंपिक सामन्यांची मशाल १४ ऑगस्ट रोजीं ऑलिंपिया ( ग्रीस ) येथें पेटविण्यांत येईल आणि ती ११ देशांतून प्रवास करून टोकियो येथें ९ ऑक्टोबर रोजीं पोंचेल. हें अंतर धावून तोडण्यासाठी १,००,६९६ तरुण लागतील.

### रिझर्व्ह बँकेच्या नोकरांचीं निदर्शनें

रिझर्व्ह बँकेच्या " ड " वर्गाच्या नोकरांनीं मुंबई येथील कचेरींत शनिवार, दि. ४ रोजीं दुपारीं १ ते १--३५ पर्यंत निदर्शनें केलीं. रहाण्यासाठी बिऱ्हाडें मिळावींत अशी त्यांची मागणी आहे.

### केंद्रीय सहकारी बँकांचें फेडरेशन

सहकारी केंद्रीय बँकांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी ऑल इंडिया स्टेट को. बँक्स फेडरेशनची स्थापना झाली आहे. त्याचे प्रा. ध. रा. गाडगीळ हे चेअरमन आहेत. फेडरेशनची मुख्य कचेरी मुंबई येथें आहे.

### पाकिस्तानला रशिआची मदत

सवलतीच्या दरानें कर्ज देण्याची तयारी दाखविल्यामुळें पाकिस्तान रशिआकडून आर्थिक मदत घेणार आहे. रशिआनें १·१ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. ह्या मदतीचा उपयोग करून पाकिस्तान ट्रॅक्टर्स, माती उकरण्याची व उचलण्याची यंत्रसामग्री आणि बांधकामासाठी लागणारीं अवजारें विकत घेणार आहे. हें कर्ज जमेस धरून रशिआनें पाकिस्तानला दिलेल्या कर्जाचा आकडा ४·१ कोटी डॉलर्सपर्यंत जातो. पाकिस्तानला कित्येक आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनांकडून मिळालेल्या कर्जावर ५ ते ६ टक्के व्याज द्यावें लागतें. पण रशिआ मात्र ३ टक्केच व्याज आकारणार आहे. पाकिस्तानांत जमीन सुधारणा करण्याच्या ज्या योजना आखण्यांत आल्या आहेत, त्यांचें काम पार पाडण्यासाठी कर्जाचा उपयोग करण्यांत यावयाचा आहे. अमेरिकेनें पाकिस्तानला आतांपर्यंत आर्थिक व लष्करी मिळून ४०० कोटी डॉलर्स मदत दिलेली आहे.


तुमची जिल्हाळ्याची बँक **बँक ऑफ महाराष्ट्र लि.**


**संचालक मंडळ**

अध्यक्ष - श्री.वा.पुं.वर्दे
उपाध्यक्ष - श्री.म.स.पारखे
सभासद
श्री. भा.म.गुप्ते | श्री. मा.वी.शहा
श्री. शं. ल.किर्लोस्कर | श्री. ज.के.रेगे
श्री. वि. सी.शिरगावकर | श्री. र.भि. बांठिया
श्री वि. रा.डफळे | श्री.मा.ल. आपटे
श्री. व. श्री. वैद्य

**भांडवल**

वसूल भांडवल व गंगाजळी } १ कोटीचे वर
खेळतें भांडवल: ३७ कोटींचे वर

■ सोयीस्कर बचत योजना ■ विदेश विनिमयाची सोय
■ प्रमुख ठिकाणीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्
• व्यापार व उद्योग यासाठीं कर्जाची सोय
• औद्योगिक विकासासाठीं मध्यम मुदतीच्या कर्जाची खास योजना



**आपल्या ९१ शाखांतिशीं तुमच्या सेवेस सिद्ध**

# जेट विमान-वाहतुकीने निर्माण केलेली एक समस्या


## *आरामाबरोबर अस्वस्थतेत वाढ*

श्री. श्री. वा. काळे, पुणे

मुंबई येथे राष्ट्रीय संरक्षण–निधीसाठी झालेल्या क्रिकेटच्या महोत्सवी सामन्यात भाग घेण्याकरिता वेस्ट इंडीजचे क्रिकेटपटू आले होते. हजारो मैलांचा विमान-प्रवास संपवून ते सकाळी सांताक्रूझ विमानतळावर उतरले आणि थोड्याच वेळात क्रीडांगणावर खेळण्यासाठी दाखलही झाले. पंडित नेहरू परदेशांचा दौरा संपवून विमानातून पालम विमान तळावर बाहेर पडले. ते तडक आपल्या कचेरीत जाऊन कामाला लागले, असे आपण कित्येकदा वृत्तपत्रातून वाचले आहे. विमानातून प्रवास करणे आरामाचे असते, त्यामुळे घरा-तून दोन-तीन मैलावरच्या कचेरीत मोटारीत बसून जाण्या-इतकाही त्रास होत नाही, अशी अनेकांची कल्पना असते. विमानाच्या हजार-पाचशे मैलांच्या प्रवासाचे काहीच दुष्परिणाम भासत नाहीत, हे खरे आहे. पण यापेक्षा दूरच्या प्रवासामुळे मात्र उतारूच्या शारीरिक व मानसिक यंत्रणेत तात्कालिक अंतस्थ बदल घडून येतो आणि त्याचा उपद्रव होतो ह्याकडे आता वैद्यकीय तज्ज्ञांचे लक्ष वेधून राहिले आहे. विमानात उकडत नाही, घाम येत नाही, धूळ लागत नाही, पाय पसरता येतात, हे सर्व खरे असले तरी उतारूच्या शरीरधर्माचे वेळापत्रक चुकल्यामुळे अस्वस्थता निर्माण होते; व ती कार्यक्षमतेला बाधक होते.

टोकियोहून तेथील मंगळवारी सकाळी निघालेले विमान लंडनला तेथील बुधवारी सकाळी पोचते. हा पूर्व–पश्चिम प्रवास चालू असताना सतत सूर्यप्रकाशच असतो. उतारू लंडनला विमानातून उतरतात, तेव्हा ते अगदी गोंधळून गेलेले असतात. कारण, ते लंडनला पोचतात, ती वास्तविक त्यांची गाढ झोपेची वेळ असते. पण विमानतळावरचे घड्याळ दाखवते सकाळचे नऊ! उतारूंचे शरीर, हे घड्याळ मानायला तयार नसते. विमानातून रेखांश ओलांडीत दूरचा प्रवास करणाऱ्या सर्वांनाच असा अनुभव येतो. त्यांना चित्त एकाग्र करता येत नाही. म्हणून, अशांनी विमानातून उतरता क्षणीच महत्त्वाच्या चर्चातून भाग घेऊ नये, तपासणीची जबाबदारीची कामे करू नयेत, अशी सूचना स्टँडर्ड ऑइल कंपनीने आपल्या अधिकाऱ्यांना दिली आहे. दूरदूरच्या लष्करी तज्ज्ञांना विमानाने बोलावून त्यांच्याशी तावडतोब महत्त्वाची खलबते करण्याचे सेनाप्रमुखांनी टाळावे, त्यांना स्थिर व्हायला अवधी द्यावा, असा एका लष्करी वैद्यकीय तज्ज्ञाचा सल्ला आहे.

पृथ्वी चोवीस तासांत एकदा स्वतःभोवती फिरते. त्या गतीला अनुसरून काही ठराविक क्रिया ठराविक वेळी करण्याची मनुष्याला सवय जडून जाते. माणूस रात्री झोपतो आणि सूर्योदयाबरोबर उठून कामास लागतो. मलमूत्रविसर्जन, मानसिक तत्परता, नाडीचे ठोके, शरीराचे तपमान, श्वासोच्छ्वास, पचनेंद्रिये आणि आतडी ह्यांची क्रिया, मूत्राशयाचे काम, ही सर्व दिवस-रात्रीच्या चक्राशी संबद्ध असतात. त्याला अनुसरून खाण्यापिण्याच्या वेळाही ठरून जातात. ह्या सर्वांत सुसंगती राहिली नाही, त्यांत




उलटापालट झाली, म्हणजे शरीराची कार्यक्षमता कमी होते आणि ती पूर्वस्थितीस पुन्हा येण्याला अवधी लागतो.

विमानाने पूर्व-पश्चिम किंवा पश्चिम-पूर्व प्रवास करणारावर जसा परिणाम होतो, तसा दक्षिण-उत्तर किंवा उत्तर-दक्षिण प्रवास करणारावर होत नाही. पृथ्वीची स्वतः-भोवतालची एक प्रदक्षिणा पुरी होते, तिला अनुसरून तिचे २४ विभाग कल्पिलेले आहेत. विषुववृत्तापासून उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जावे, तसे हे विभाग चिंचोळे होत जातात. शालेय भूगोलाच्या पुस्तकात प्रत्येकाने वाचलेली ही गोष्ट विमानाच्या उतारूंना आणि वैमानिकांना व्याव-हारिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाची झाली आहे. विमानातून हे जितके ज्यास्त विभाग वेगाने ओलांडून जावे, तेवढे ज्यास्त फरक उतारूच्या शरीर-यंत्रणेत निर्माण होतात.

विषुववृत्तावर रात्र होण्याची (म्हणजे सूर्याची) गति ताशी १,०३८ मैल, तर ४०° अक्षांशावर ती ताशी ७९५ मैल असते; ध्रुवाजवळच्या प्रदेशांत ती ताशी फक्त १८० मैल असते.

पॅरिसहून न्यूयॉर्कला जाण्यासाठी जेट विमान संध्याकाळी निघाले आणि ते ५० व्या अक्षांशावरून ताशी ५२० मैलाने गेले, तर ते न्यूयॉर्कला सूर्यास्तानंतर तीन तासांनी पोचेल. म्हणजे रात्र पडण्याचा वेग विमानाच्या वेगापेक्षा जास्त असेल. त्याच वेळी निघून त्याच वेगाने कोपनहेगन ते अँकरेज (अलास्का) हे तेवढेच अंतर तोडणारे विमान रात्र पडण्याच्या वेगापेक्षा जास्त गतीने गेलेले आढळेल. त्या विमानातील उतारूंना डेन्मार्कमध्ये सूर्य मावळताना दिसेल आणि तो पश्चिमेकडे उगवताना दिसेल! लिमा ते न्यूयॉर्क दक्षिणोत्तर प्रवास करणारे विमान वेळा–विभाग ओलांडीत नसल्याकारणाने, त्याला अशा प्रसंगांचा अनुभव येणार नाही.

प्रारंभी सांगितलेल्या टोकियो-लंडन प्रवासातील उतारू लंडनला तेथील स्थानिक वेळेप्रमाणे सकाळी पोचले खरे, पण त्यांच्या शरीराला रात्रीचीच अवस्था भासत होती. अशा प्रकारातून उपाय योजण्याची आवश्यकता पटून त्याबाबत संशोधन सुरू झाले आहे. आंतरराष्ट्रीय परिषदांतील पहिल्या काही दिवसात महत्त्वाची चर्चा टाळलेली बरी; पश्चिमेकडून पूर्वेकडे आलेल्यांनी सुरुवातीला सकाळी आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे आलेल्यांनी संध्याकाळी महत्त्वाचे निर्णय घेऊ नयेत असे सांगितले जात आहे; कारण, नट, बुद्धिबळपटू,

क्रीडास्पर्धक, शर्यतीचे घोडे, ह्या सर्वांची बौद्धिक वा शारीरिक कार्यक्षमता त्या वेळी नेहमीप्रमाणे नसते.

माणसाच्या अवस्थेत केवळ वेळा-विभाग वेगाने ओलांडल्यामुळेच किती फरक पडतो, हे नेमके सांगणे कठीण आहे; इतरही गोष्टींचा त्याच्यावर परिणाम होत असतो. अपरिचित वातावरण, भाषेतील बदल, हवामानात फरक, ह्याही बाबी त्याला थोडेतरी अस्वस्थ करीत असतातच. त्यांची छाननी करणे कठीण आहे. म्हणून शास्त्रज्ञांनी मनुष्यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राण्यांवर प्रयोग सुरू केले आहेत. उंदीर, ससे, पक्षी, मासे, वनस्पती ह्या सर्वांचा प्रयोगासाठी उपयोग करून घेण्यात येत आहे. समुद्रातील प्राण्यांच्या शारीरिक हालचालींवर भरती-ओहोटींचा परिणाम होत असतो. हा परिणाम त्यांच्या इतक्या सवयीचा झालेला असतो, की भरती-ओहोटीची वेळ होताच त्यांच्या हालचाली सुरू होतात. कालव (ऑयस्टर) हा जलचर त्याच्या 'अ' ठिकाणाहून उचलून दूरवरच्या 'ब' ठिकाणी अंधारात नेऊन ठेवला तरी 'अ' ठिकाणच्या भरतीच्या वेळी तो डोळे उघडतो! 'ब' ठिकाणच्या भरतीची वेळ अंगवळणी पडायला त्याला दोन आठवडे लागतात. खेकड्यांचे बाबतीतही असेच घडते.

विमानातील एअर होस्टेस उतारूंच्या सुखसोईकडे लक्ष देते; त्यांना अगत्याने खाऊपिऊ घालते. त्यामुळे उतारू ज्यास्त वेळा आणि ज्यास्त खाणे-पिणे करतात; त्यांना सुस्ती येऊन ते पेंगळून जातात. पण इकडे त्यांचे पोट मात्र अस्वस्थ होऊ लागते. न्यूयॉर्कहून रात्रीच्या विमानाने रोमला निघालेला उतारू पोटभर जेवतो; भरपूर मद्य पितो. ५,००० ते ८,००० फूट उंचीवरील मद्याचे दोन पेले समुद्रसपाटीवरील तीन पेल्याइतके परिणामकारक ठरतात. पिणे संपवून ते झोप घेण्याचा विचार करतात, इतक्यात पॅरिस शहरावर सूर्योदय झालेला त्यांना दिसतो; रात्र संपून दुसरा दिवस सुरू होतो. झोपेला वेळच मिळत नाही. विमानात उतारूंनी कमीत कमी खावे व प्यावे, जागरण करूं नये. निघण्यापूर्वीच्या २४ तासांत निरोपसमारंभाच्या मेजवान्या टाळाव्यात, असा पॅन अमेरिकन कंपनीच्या वैद्यकीय संचालकांचा सल्ला आहे. एक अनुभवी उद्योगपति प्रवासात जेवीत नाही; फारतर खिशातले चोकोलेट चघळतो. मुक्कामाला पोचल्यावरही भोजन न करता, सुरुवातीचे काही तास चोकोलेटवरच भागवितो. जेवणाची खरी वेळ झाली, म्हणजे नेहमीप्रमाणे जेवतो. त्यामुळे त्याला प्रवास बाधत नाही. विमानतळावरील अलिशान होटेलांतून उतारूंच्या सुखसोयींची उत्कृष्ट व्यवस्था केलेली असते. तरी आपल्या शरीरांतर्गत संघर्षाला त्यांना स्वतःच तोंड द्यावे लागते. टोकियो येथील इंपीरिअल हॉटेलमध्ये मात्र अशा उतारूंच्या आरामाची पद्धतशीर व्यवस्था करण्यात आली आहे. तेथील खोल्यांतून उतारूच्या मूळ ठिकाणाप्रमाणे कृत्रिम दिवस-रात्र निर्माण करण्यात येते आणि त्याला अनुसरून जेवणखाण, झोप इत्यादींची सोय करण्यात येते.

ज्या दिवशी आपले काम असेल, त्याच्या आधीच काही दिवस मुक्कामाला पोचावे, म्हणजे विमानाच्या प्रवासाचे परिणाम तोवर कमी झालेले असतील, असे डॉक्टर म्हणतात. (मग, वेगवान विमानातून प्रवास केल्याने वेळ कसा वाचणार?) ज्या ठिकाणी जावयाचे, तेथील स्थानिक वेळेप्रमाणे काही काळ निघण्यापूर्वी घालवावा (म्हणजे, दुपारी निजण्याची आणि रात्री-अपरात्री भोजनाची व जागरणाची सवय करावी!) ही सूचनाही अमलात आणणे कठीण आहे. झोपेसाठी औषधे घेणेही श्रेयस्कर नव्हे.

सुपरसॉनिक (स्वनातीत) जेट विमानांनी काही गोष्टी सोप्या केल्या तर काही गोष्टी बिकट केल्या आहेत. समुद्रसपाटीपासून खूप उंचीवरून प्रवास केला, तर पृथ्वीच्या गतीपेक्षा जास्त गतीनें पश्चिमेकडे जाऊन, सूर्याच्याही पुढे जाऊन, पूर्वेला सूर्यास्त पाहाता येतो. परंतु, माणसाने आपल्या जीवनावर होणाऱ्या वेळाच्या परिणामांचे नियंत्रण करायला शिकल्याखेरीज ह्या कौतुकाच्या बाबी त्रासदायक होत जातील. माणसाची तरतरी पहाटे तीनच्या सुमारास सर्वांत खालच्या पातळीला पोचलेली असते, असे स्वीडनमधील प्रयोगांनी दाखवून दिले आहे. त्यावेळी कोणतेही काम करायला इतर वेळेपेक्षा ज्यास्त श्रम पडतात; चुका ज्यास्त घडतात. एखादा उतारू अर्धी पृथ्वी ओलांडून जाऊन सरळ महत्त्वाच्या कामाला लागला आणि त्यावेळी त्याचे शरीर व मन त्याच्या मूळ गावाच्या स्थानिक वेळेप्रमाणे पहाटे तीनच्या अवस्थेत असले, तर त्याचे निर्णय चुकण्याचा बराच संभव आहे.

ज्या कारखान्यातून तीन पाळ्या काम चालू असते, तेथे कामगारांच्या कामाच्या पाळ्या वरचेवर बदलणे श्रेयस्कर नसते. कारण, नवी पाळी अंगवळणी पडायला त्यांना वेळ लागतो. तीच गोष्ट वरचेवर दूरचे विमानप्रवास करणाऱ्या कारखानदारालाही लागू आहे. तो असे प्रवास सतत करू लागला, तर प्रत्येक प्रवासानंतर पूर्वस्थितीस येण्याला त्याला संधीच मिळणार नाही. म्हणजे, तो शंभर टक्के अक्कलहुशार कधीच असणार नाही. पिस्टन इंजनांच्या विमानांऐवजी जेट विमाने चालविण्यास ज्या वैमानिकांनी प्रारंभ केला, त्यांना शीण अधिक जाणवू लागला, हे सिद्ध झाले आहे. अनुभवी वैमानिक पूर्व-पश्चिम प्रवासापेक्षा दाक्षिणोत्तर प्रवास करणारी विमानेच अधिक पसंत करतात, ते उगीच नाही.

—सृष्टिज्ञान

• • •

## कोचीन येथील बोटी बांधण्याचा कारखाना

बोटी बांधण्याचा भारतामधील सार्वजनिक मालकीचा दुसरा कारखाना जपानच्या साह्यानें कोचीन येथें बांधण्याचें आतां निश्चित झालें आहे. कारखान्यासंबंधीं अजून कांहीं तपशील ठरावयाचा आहे. तो ठरल्यावर करार पक्का करण्यांत येईल. १९६८ सालीं कारखान्यांत तयार झालेली पहिली बोट समुद्रप्रवेश करील. कारखान्यांतील यंत्रसामग्रीच्या साह्यानें दरसाल १५ हजार टन वजनाच्या दोन आणि २० हजार टन वजनाच्या दोन बोटी बांधतां येतील. तथापि दरसाल एकच बोट बांधावयाचें ठरल्यास कारखान्यांत ७५ हजार टन वजनाची बोटहि बांधतां येईल. बोटी बांधण्याचा भारतामधील पहिला सार्वजनिक मालकीचा कारखाना पूर्वकिनाऱ्यावर विशाखापट्टण येथें आहे. आतां पश्चिम किनाऱ्यावरहि एक कारखाना होत आहे.

## आपल्या छापखान्यांत असें घडत नाहीं ना ?

सकाळचे साडेअकरा वाजले आहेत. छापखान्यांतील प्लेटनुयंत्रें घरंगळत्या आवाजांत चालूं आहेत. दोन जुळाऱ्यांपैकी एक जण केसीपाशीं उभा राहून काम करीत आहे. दुसरा कॅबिनेटला टेकून 'दैनिक मराठा' वाचत आहे. छापखान्यांतला एकुलता एक शिपाई +बॉलर+निरोप्या+मिळून सर्व कांहीं घटकाभर प्रेसमनजवळ तर घटकाभर जुळाऱ्याबरोबर गप्पा मारून त्यांची करमणूक करीत आहे. फक्त खुर्ची आहे रिकामी चालकाची. कारण चालक बहुधा बाराच्या पुढें छापखान्यांत येतात. त्यांचा मुनीम+अकाऊन्टंट मिळून विश्वासांतला माणूस कांहीं जरूरीच्या कामासाठी (आदल्या दिवशीं चालकांनीं पेपरवाल्याला चेक दिलेला असतो, त्याच्या पुऱ्या पैशाचा बँकेंत भरणा करण्यासाठी ) कदाचित् स्वारी बँकेंत गेली असेल. त्यामुळें त्याचें आसनहि रिकामें आहे. अशा वेळीं टेलिफोनची घंटी खणाणून वाजते. ( टेलिफोनची घंटी बहुधा नेहमींच्या आवाजांत वाजते, पण ती वेगवेगळया मनस्थितींत वेगवेगळ्या तऱ्हेनं वाजल्यासारखी वाटते. ) पुष्कळ गप्पासप्पा झाल्यामुळें थकलेला पोऱ्या एक जंगी डुलकी घेण्याच्या तयारींत असतो, त्याला ती नारोशंकराच्या किंवा नोत्रदामच्या घंटानादाप्रमाणें वाटते. तोंडानें कांहींतरी पुटपुटत तो टेलिफोनजवळ जातो, रिसिव्हर कानाला दाबून किंचाळतो, "हालाऊ ऽ"

अनेक छापखान्यांना लहानमोठीं छपाईचीं कामं देणाऱ्या एका मोठ्या मुद्रणग्राहकाचा तो टेलिफोन असतो; या छापखान्याला पण त्यांचीं कामें मधूनमधून मिळत असतात. ग्राहक टेलिफोनमधून कंपनीचं नांव सांगतो व मग म्हणतो, "हें बघा, मला लवकरांत लवकर एक काम छापून घ्यायचं आहे. कोण बोलतंय ?"

"हालाऊ, हालाऊ, अहो राव जराशे मोठ्यानं बोला," औट घटकेचा चालक फर्मावतो.

"विश्वकला प्रेस ना ? मला एक काम ताबडतोब छापून हवं आहे. मिस्टर परमेश्वरन् कुठं आहेत ?" ग्राहकाला टेलिफोन लाईनमधले बिघाड ठाऊक असतात. म्हणून तो मोठ्यानें बोलतो.

"अंमळशे उभे ऱ्हा. इचारून बघतों," पोऱ्या टेबलावर कडकन रिसिव्हर ठेवतो—

जरा वेळ संपूर्ण शांतता असते. एका बाजूला मुद्रणग्राहक भक्ताप्रमाणें 'परमेश्वराची' वाट पहात असतो.

"परमेश्वर ब्यांकींत ग्येलाय," पोऱ्या पुन्हां टेलिफोनवर येतो.

"अच्छा, मग आणखी कोण आहे तिथं ? माझं काम फार जरूरीचं आहे." ग्राहक म्हणतो, "मिस्टर तारकर तरी आहेत कां ?"

"जराशे थांबा. इचारून सांगतो—" रिसिव्हर टेबलावर पुन्हां कडाडून आपटतो. जरा वेळ शांतता.

"आज शेटला यायला उशीर होणार आहे. चार वाजतां फोन करा—" पोऱ्या फर्मावतो आणि टेलिफोन बंद होतो.

आणि त्याचवेळीं मुद्रणालय एका चांगल्या कामाला आणि ग्राहकाला मुकतें. खरी चूक कोणाचीहि नाहीं. पोऱ्याची ? नाहीं. तो आपल्या बुद्धीप्रमाणें बोलला. परमेश्वरन्‌ची ? ती कशी ? त्यानें कामाला जाऊं नये काय ? तारकर शेठची ? ते तर उशीराच येतात !

कारण कांहीं कां असेना ! पण असा प्रवेश आपल्या पश्चात आपल्या छापखान्यांत घडत नाहीं, याची खात्री करा.

—प्रिंट बुलेटिन वार्षिक, १९६४




शीतल, झुळझुळीत,
आणि वापरायला
अत्यंत मनोरम व सुखद
ठाकरसी
फॅब्रिक्स
फॅशनसाठीं सर्वोत्तम पसंती
या कापडावर असें लेबल असतें
·SANFORIZED·

THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
● धी हिंदुस्तान स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड
● धी क्राउन स्पिनिंग अॅण्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
● धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड

### अमेरिकन शेतकऱ्यांची मदत

प्रेसिडेंट केनेडी ह्यांच्या शांततापथकांतील तीन अमेरिकन शेतकरी भारतामधील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी नाशिक येथें आले आहेत. ते ह्या भागांत २० महिने राहणार असून हिंदी शेतकऱ्यांना दुधदुभत्याच्या धंद्याची व कोंबडी पाळण्याच्या धंद्याची सक्रिय माहिती देणार आहेत. शांतता पथकाची ही योजना प्रथम १९६० सालीं सुरू करण्यांत आली. तेव्हांपासून १०९ अमेरिकन शेतकरी भारतांत आले. त्यांतील २५ महाराष्ट्रांत आलेले आहेत. अमेरिकन पथकाचा प्रमुख ह्या साह्यक योजनेविषयीं म्हणाला कीं. हिंदी शेतकरी आणि अमेरिकन शेतकरी ह्यांच्या अनुभवाची देवाण घेवाण करण्याचा योजनेचा मुख्य हेतु आहे. भारतांत आर्थिक दृष्ट्या आंतबट्ट्याची असलेली शेती बरीच असून तिची सुधारणा केल्या-खेरीज उत्पादनांत वाढ होणार नाहीं.

### भारताचा कोळशाचा सांठा

भारतांतील कोळशाचा भूपृष्ठाखालील साठा ४०० कोटी टन आहे, असा अंदाज करण्यांत आला आहे. ६०० फुटांपेक्षा खोल असलेला कोळसा म्हणजे त्यांपैकी सुमारें निम्माच कोळसा खाणींतून काढणें आर्थिक दृष्ट्या परवडेल; म्हणजे प्रत्यक्ष उत्पादन २०० कोटी टन होऊं शकेल. हा सांठा १०० वर्षें पुरेल.

### ग्रेट ब्रिटनमधील पहिलें उर्दू दैनिक


३ जुलै, १९६४ रोजीं ग्रेटब्रिटनमध्यें "उर्दू टाइम्स" हें उर्दू दैनिक सुरू झालें. ग्रेट ब्रिटनमधील उर्दू भाषिक हिंदी आणि पाकिस्तानी लोकांसाठी तें काढण्यांत आलें आहे. विल्यम मॅकलेलन हा इंग्रज आणि फरूक अहमद सालेम हा पाकिस्तानी त्या दैनिकाचे डायरेक्टर आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१९००
वचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्ट
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ " |
| ठेवी | ... | रु. | ४१४ " |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५० " |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८
ALCO

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (ए. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.